सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग,शासन निर्णय क्र. पीईक्यु ०२२५/प्र.क्र.१८५/पोल-४ दि. २१ मे,२०२५.

**विषय** :- AMBIS संगणकीय यंत्रणेअंतर्गत परीक्षेत्र स्तरावरील ०७ Server हे ०२ नवनिर्मित पोलीस आयुक्तालये व पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांच्या अखत्यारीतील ०५ प्रादेशिक विभाग या ठिकाणी पुर्नस्थापित , कार्यान्वित करण्याच्या खर्चास मान्यता देण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग,शासन निर्णय क्र. पीईक्यु ०२२५/प्र.क्र.१८५/पोल-४, दि. २१ मे,२०२५. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०५२११७५०९१६२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 27-05-2025 17:09:16

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (नि.व स.),महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक, (नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी का.क्र.१७

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**AMBIS संगणकीय यंत्रणेअंतर्गत परीक्षेत्र स्तरावरील ०७ Server हे ०२ नवनिर्मित पोलीस आयुक्तालये व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अखत्यारीतील ०५ प्रादेशिक विभाग या ठिकाणी पुर्नस्थापित, कार्यान्वित करण्याच्या खर्चास मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक पीईक्यु ०२२५/प्र.क्र.१८५/पोल-४**
मंत्रालय, मुंबई - ४०००३२,
दिनांक :- २१ मे, २०२५

**संदर्भ :** १) शासन निर्णय, गृह विभाग क्र.एफपीबी-०७१६/प्र.क्र.५५०/पोल-४, दि.११.११.२०१६,
२) शासन पत्र, गृह विभाग क्र.एफपीबी-०७१६/प्र.क्र.५५०/पोल-४, दि.२४.०३.२०१७,
३) अपर पोलीस महासंचालक (नि. व सं.), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/१७/६१६२/ AMBIS प्रकल्प / ९५/२०२२ , दि.२४.०२.२०२५.
४) उच्चस्तरीय शक्ती प्रदान समितीच्या दि. १३.०२.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र पोलीस दलासाठी AMBIS (Automated Multi-Modal Biometric Identification System) ही नविन प्रणाली खरेदी करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पामध्ये Chance Print Verification करण्याच्या स्तरांमध्ये (Levels) केंद्र सरकारच्या NAFIS संगणकीय यंत्रणेच्या स्तरांप्रमाणे बदल करण्यास शासन मान्यता देण्यात आल्यामुळे परीक्षेत्र स्तरावर पुरविण्यात आलेले AMBIS यंत्रणेचे ०७ Server हे वापरात येणार नसल्यामुळे त्यांचे स्थानांतरण करून ते बृहन्मुंबई मधील ०५ प्रादेशिक विभाग व ०२ नवीन पोलीस आयुक्तालये या ठिकाणी पुर्नस्थापित करून कार्यान्वित करण्याच्या प्रस्तावावर दिनांक १३/०२/२०२५ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीत चर्चा करण्यात येवून त्यास मंजूरी देण्यात आली आहे.

**शासन निर्णय :-**

AMBIS संगणकीय यंत्रणेअंतर्गत परीक्षेत्र स्तरावरील ०७ Server हे ०२ नवनिर्मित पोलीस आयुक्तालये व पोलीस आयुक्त, ब6हन्मुंबई यांच्या अखत्यारीतील ०५ प्रादेशिक विभाग या ठिकाणी पुर्नस्थापित, कार्यान्वित करण्यास तसेच त्यासाठी खालील तपशिलानुसार येणाऱ्या रु. १,७६,४३,७८६/- (अक्षरी रुपये एक कोटी शहात्तर लक्ष त्रेचाळीस हजार सातशे शहाऐंशी फक्त) (G.S.T.सह), AMC करिता रु.५,९५,४६३/- (अक्षरी रुपये पाच लक्ष पंच्याण्णव हजार चारशे त्रेसष्ट फक्त) (G.S.T.सह) आणि साईट भेटीचा खर्च रु. ३७,२८८/- (अक्षरी रुपये सदतीस हजार दोनशे अठ्ठयाऐंशी फक्त) (G.S.T.सह) इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| Sr.N | Item | Description | Total price with Taxes(In INR) |
|---|---|---|---|
| 1 | Software for New District | a. Creation of 02 District in Pune FPB<br>b. Creation of 05 Districts in Mumbai FPB | 1,76,43,786 |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | Quarterly Maintenance (AMC) | Invoiced in Pro-Rata temporis up to the end of the contract | 5,95,463 |
| 3 | Installation Cost Per site (Optional cost) | Flat rate if no remediation | 37,288 |
| This optional cost will be applicable on per site basis if site visit is required Hardworking for the connection (power hard work and/or CCTNS network hard work) | | | |

**२.** सदरचा खर्च गृह विभाग "मागणी क्र.बी-१,२०५५ पोलीस (००) ११५ पोलीस दल आधुनिकीकरण (०१) तंत्रज्ञान विकास प्रकल्प (०१) (०१) तंत्रज्ञान विकास प्रकल्प (२०५५ A०३२) ५२-यंत्रसामुग्री व साधनसामुग्री" या लेखाशिर्षाखाली सन २०२५-२६ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

**३.** सदर प्रकरणी अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून आणि त्यांच्या अधिनस्त कार्यालय अधिक्षक यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

**४.** सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका -१९७८,भाग- पहिला, उप विभाग-तीन,अ.क्र.४ नियम क्र.२७ (२) अन्वये प्रशासनिक विभागास असलेल्या पूर्ण प्राधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०५२११७५७०९१६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by ARCHANA VILAS WALZADE
Date: 2025.05.21 17:58:38 +05'30'

**( अर्चना वालझाडे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. महालेखापाल, महाराष्ट्र १ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), मुंबई
३. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. अपर पोलीस महासंचालक (नि.व सं.), महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई
५. अधिदान व लेखा अधिकारी/ निवासी लेखा अधिकारी, मुंबई
६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
७. कक्ष अधिकारी (अर्थसं-१),गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
८. निवड नस्ती, गृह विभाग/ पोल-४,मंत्रालय, मुंबई.